## अपंग कल्याणकारी योजना :-

ज्यांना मदतीची आत्यंतिक गरज आहे असा आणखी एक महत्वाचा वर्ग म्हणजे अपंग आणि विकलांग त्यांच्या कल्याणासाठी, त्यांना काही आधिकार देण्यासाठी विविध योजना /सहाय्यक तंत्रज्ञान समाज विकास विभागामार्फत पुरविण्यात येते. विविध साधनांची मदत उपलब्ध करुन देणे आणि त्यांचे सामाजिक - आर्थिक पुनर्वसन करणे इत्यादी गोष्टीचा यात समावेश असेल. याकरीता दोन कोटी रु ची तरतुद करण्यात आली आहे.

१) १८ वर्षावरील व्यक्तीसाठीच अंध, अस्थिव्यंग व इतर अपंगत्व असणा-या लाभार्थ्यांना लघुद्योग व्यवसायासाठी प्रत्येकी रुपये ५०००/- प्रमाणे अनुदान. - (कमाल ५०० लाभार्थी )

२) सक्षम वैद्यकीय डॉक्टराकडून (एम.एस./एम.डी./एम.बी.बी.एस.) उपचाराबाबतचे अंदाजखर्चाची मूळ प्रत सादर करणा-या अंध, अस्थिव्यंग, कर्णबधीर, मतिमंद यांचे शारिरीक, मानसिक उपचारासाठी प्रत्येकी रुपये ६०००/- प्रमाणे अनुदान - (कमाल ४२५ लाभार्थी )

३) एस. एस. सी. उत्तीर्ण अपंग व्यक्तींना शासन मान्य MSCIT प्रशिक्षण देणे. (कमाल ५०० लाभार्थी )

४) नकली पाय (जयपुरफूट ) प्रत्येकी -

(अ) गुडघ्यावर - AK - (कमाल १०० लाभार्थी )

(ब) गुडघ्याच्या खाली - BK - (कमाल १०० लाभार्थी )

(क) कुबडया प्रत्येकी २ नग प्रमाणे - (कमाल २०० लाभार्थी )

(ड) कॅलीपर्स व बुट एका पायासाठी ( पाच वर्षाचे आतील बालकास) (कमाल १०० लाभार्थी )

(इ) ब्रेसेस आणि बुट (६ वर्षावरील सर्व लाभार्थीसाठी) - (कमाल १०० लाभार्थी )

५) (अ) व्हील चेअर लहान मुलांसाठी (स्टॅण्डर्ड साईज चार चाकी) - (कमाल २०० लाभार्थी )

(ब) व्हील चेअर प्रौंढासाठी - (कमाल २०० लाभार्थी )

६) ट्रायसीकल (स्टॅण्डर्ड साईज) - (कमाल ३०० लाभार्थी )

७) वॉकर - (कमाल १०० लाभार्थी )

८) कमोड चेअर - (कमाल १०० लाभार्थी )

९) कमोड स्टूल - (कमाल १०० लाभार्थी )

१०) एल्बो क्रॅचेस (जोडी) - (कमाल १०० लाभार्थी )

११) अंधांसाठी बेल काठया - (कमाल ३०० लाभार्थी )

१२) कर्णबधीरांसाठी श्रवणयंत्र - (कमाल ५०० लाभार्थी )

१३) स्पायनल आणि मील वॉकी ब्रेस - (कमाल १५ लाभार्थी )

ठाणे महानगरपालिकेतील महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महिला व बालकल्याण समितीच्या मार्फत सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात वेगवेगळया ३० योजनासाठी अर्थसंकल्पात एकुण रु ३१,०२,३५,०००/- मात्रची तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

दरवर्षी मोठया प्रमाणात आर्थिक तरतुद केली जाते परंतु आवश्यक कागदपत्रास अर्ज प्राप्त होत नाहीत. म्हणुन विभागाकडुन सर्व योजनांची एकत्रित माहिती पुस्तीका तयार करण्यात येत आहे. जेणेकरुन जास्तीत-जास्त लाभार्थ्यांना या विविध योजनांची एकत्रित माहिती पुस्तीका तयार करण्यात येत आहे. जेणेकरुन जास्तीत-जास्त लाभार्थ्यांना या विविध योजनांचा फायदा घेता येणार आहे.

जसे की आर्थिक दुर्बल घटकांतील महिलांच्या वैयक्तिक कामांच्या योजना, बचत गटांसाठी विविध योजना प्राशिक्षण कार्यक्रम, उच्च शिक्षणासाठी मदत ठामपाच्या पूर्व प्राथामिक व पहिली ते सातवी पर्यंतच्या मुलांसाठी मुलभूत सोयी सुविधासह विविध कल्याणकारी योजनासाठी मोठया प्रमाणात तरतुद प्रस्तावित केली असुन महिला व बालकांच्या विकासास चालना मिळणार आहे.

अपंगासाठी ठा.म.पा. च्या विविध विभागामार्फत तरतुद करण्यात येते, समाज विकास विभागामार्फत अपंगाना उपचारासाठी व साहित्य खरेदीसाठी स्वंय रोजगारासाठी दरवर्षी रु दोन कोटीची तरतुद केली आहे. त्यातुन ठा.म.पा. च्या सर्व अपंग कर्मचा-यांना रु ५०,०००/- च्या आत आवश्यक साहित्य खरेदीसाठी धनादेशाद्वारे अदा केले आहेत. / खर्च केले आहेत.